ARTHA
Poona 4.

Reg. No. B. 3434. Licence No. 53.
Licenced to post without prepayment

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

वर्ष १८ पुणें, बुधवार तारीख १९ मार्च, १९५२ अंक १२

## विविध माहिती

**लखनौ म्युझिअमसाठीं ममी—** लखनौ येथील म्युझिअममध्यें ठेवण्यासाठीं इजिप्तकडून दोन ममी मिळविण्यांत आल्या आहेत. त्यापैकीं एक ख्रिस्त शकापूर्वी ६०० वर्षांची असून दुसरी १,००० वर्षांपूर्वीची आहे. असुर बनिपाल ह्या इराणच्या राजाच्या कालांतील कांहीं शिल्पकृतीहि म्युझिअममध्यें ठेवण्यांत येणार आहेत. हा राजा ख्रिस्तपूर्व ८०० च्या सुमारास होऊन गेला.

**जपानकडून मिळणाऱ्या लुटींतील हिस्सा—** गेल्या महायुद्धांत जपाननें लुटलेल्या मालाची विक्री करून ३५ लाख डॉलर्स आले आहेत. त्यापैकीं ८ टक्के रक्कम भारताला मिळणार आहे. पाकिस्तान, ऑस्ट्रेलिआ व फ्रान्स ह्या राष्ट्रांनाही इतकाच भाग मिळणार आहे. लुटीची वांटणी अमेरिकेनें आपल्या मतानें केली आहे, कारण त्याबाबत दोस्त राष्ट्रांत मतभेद होते.

**कार्ल मार्क्सच्या पत्राची किंमत—** समाजवादाचा संस्थापक कार्ल मार्क्स ह्यानें १८७५ सालीं ब्रिटिश प्रकाशकाला लिहिलेलें एक पत्र उपलब्ध झालें आहे. दोघा रशिअन नागरिकांनीं ह्या पत्रासाठीं २३० पौंड देऊं केले होते. परंतु त्यापेक्षां अधिक किंमत देऊन एका ब्रिटिश नागरिकानें तें विकत घेतलें. ह्याच गृहस्थानें पहिल्या नेपोलिअनच्या पत्राचा संग्रह ५०० पौंडांना विकत घेतला आहे.

**हैद्राबादमध्यें लँड मॉर्टगेज सोसायट्या—** शेतकऱ्यांच्या सोयीसाठीं हैद्राबाद राज्यांत ८ निरनिराळ्या ठिकाणीं लँड मॉर्टगेज सोसायट्यांची स्थापना करण्यांत आली आहे, असें समजतें. राज्याच्या मुख्य प्रधानांनीं वरंगळ जिल्ह्यांत नुकताच दौरा काढला होता. त्या प्रसंगीं स्वतःची शेतजमीन नसलेल्या शेतकऱ्यांना जमीन वांटून देण्यांत आली.

**क्रिकेटच्या सामन्यांवरील कर रद्द—** म्हैसूर क्रिकेट असोसिएशनतर्फे जे क्रिकेटचे सामने भरविले जातील, त्यांच्यावर करमणूक कर न घेण्याचें म्हैसूरच्या सरकारनें ठरविलें असल्याचें समजतें.

**मुंबई शहरांतील साक्षरता—** मुंबई शहरांतील साक्षरतेचें प्रमाण १५ वर्षांपूर्वी सुमारें २४ टक्के होतें. प्रौढ शिक्षणाचें कार्य करणाऱ्या मुंबईतील कार्यकर्त्यांनीं नुकतेच जे आंकडे जमा केले आहेत, त्यावरून हें प्रमाण आतां ४७ टक्के इतकें झालें असल्याचें समजतें.

**अभ्रकाच्या निर्यातींत घट—** गेल्या कांहीं महिन्यांत भारताकडून निर्यात होणाऱ्या अभ्रकांत घट झाल्याचें समजतें. निर्यात वाढविण्याचा मध्यवर्ती सरकार विचार करीत आहे. नोव्हेंबर, १९५१ अखेर संपणाऱ्या ८ महिन्यांच्या कालांत भारतानें २,९५,००० हंड्रेडवेट अभ्रक निर्यात केलें. त्यापैकीं १,४४,००० हंड्रेडवेट एकट्या अमेरिकेनें घेतलें.

**बंगलोर येथें मेडिकल कॉलेज—** बंगलोर येथील मेडिकल स्कूलचा दर्जा वाढवून त्याचें मेडिकल कॉलेजांत रूपांतर करण्यासंबंधीं मुंबई सरकार आणि म्हैसुर सरकार ह्यांच्या दरम्यान बोलणीं चालू आहेत. म्हैसूर विद्यापीठानें ह्या कार्यासाठीं ३॥ लाख रुपयांची रक्कम आपल्या अंदाजपत्रकांत राखून ठेवली आहे. ही योजना यशस्वी झाल्यास म्हैसूर व कर्नाटक ह्यांना पुरतील इतके डॉक्टर तयार होतील.

**समाज जीवनाचीं केंद्रें—** भारत आणि अमेरिका ह्यांच्यांतील तांत्रिक साह्याच्या कराराप्रमाणें समाज-जीवनाचीं ५० केंद्रें स्थापन करण्यांत येणार आहेत. त्यापैकीं ६ उत्तर प्रदेशांत स्थापन करण्यांत येतील.

**सिंद्री खत कारखान्याचें उत्पादन—** सिंद्री येथील खताच्या कारखान्यांत गेल्या ९ तारखेला ५९१ टन खत तयार झालें. एका दिवसांत तयार झालेल्या खताचा हा उच्चांक आहे. कारखान्यांत दर दिवशीं जास्तींत जास्त १,००० टन खत तयार होऊं शकेल. आतांपर्यंत २७,५०० टन खत तयार झालें आहे.

**मुंबईत डी. डी. टी. चा कारखाना—** भारतामधील डी. डी. टी. चा पहिला कारखाना मुंबईत काढण्यांत येणार असल्याचें समजतें. कारखाना काढण्यासाठीं दिल्लीचें नांवहि सुचविण्यांत आलें होतें. कारखाना जागतिक आरोग्य संघटनेमार्फत काढण्यांत येत आहे. सीलोन, पाकिस्तान, इजिप्तमध्येंहि असेच कारखाने काढण्यांत येणार आहेत.

**पहिल्या स्त्री-मुत्सद्याचा अंत—** सोव्हिएट रशिआंतील प्रसिद्ध स्त्री-मुत्सद्दी मॅडम कोलोंटाय आपल्या वयाच्या ८०व्या वर्षी नुकत्याच निधन पावल्या. त्या क्रांतिनंतरच्या रशिअन सरकारच्या सभासद होत्या. १९३० पासून १९४५ पर्यंत त्यांनीं स्वीडनमधील सोव्हिएट वकील म्हणून काम केलें होतें. जगांतील पहिल्या स्त्री मुत्सद्दी म्हणून त्या विशेष प्रसिद्ध होत्या.

## मुंबई शेजारीं वीजउत्पादनाचा प्रचंड कारखाना

### हैड्रो-इलेक्ट्रिक योजना पुऱ्या होण्यापूर्वीची व्यवस्था

स्टँडर्ड ऑइल कंपनी व बर्मा शेल कंपनी ह्यांचें तेल शुद्धीचे कारखाने मुंबई येथें लवकरच १९५५-५६ मध्यें सुरू होतील व त्यांना चालू वर्षअखेर पासूनच कांहीं वीज लागेल. ते पूर्णपणें चालू झाले, म्हणजे त्यांना अनुक्रमें ६,५०० कि. वॅ. व ७,५०० कि. वॅ. वीज लागेल. पेनिसिलिनचा कारखाना सुरू झाला, म्हणजे त्याला ३,००० कि. वॅ. वीज लागेल. मुंबई राज्याच्या हैड्रो-इलेक्ट्रिक योजनांतुन वीज तयार होण्यास १९६० हें साल उजाडेल. तोंपर्यंत, औद्योगिक वाढ थांबवून ठेवतां येणें अशक्य आहे. म्हणून, बाष्प शक्तीचे वीज-कारखाने उभारण्याचें सरकारनें ठरविलें आहे. टाटा हैड्रो-इलेक्ट्रिक कंपनीनें मुंबईशेजारील ट्रॉम्बे बेटावर एक मोठा वीज उत्पादनाचा कारखाना उभारण्याची योजना मुंबई सरकारास कित्येक महिन्यापूर्वींच सादर केली होती. मंदी येण्यापूर्वींच त्याच्या भांडवलाची उभारणी करतां यावी, ह्यासाठी सरकारची मंजुरी लवकर मिळावी, अशी कंपनीनें विनंति केली होती. टाटांच्या सध्याच्या तीन हैड्रो-इलेक्ट्रिक कंपन्यांच्या लायसेन्सची मुदत पुरेशा दीर्घ काळानें वाढविण्यांत आली, तर ट्रॉम्बे येथें विजेच्या उत्पादनाचा नवा कारखाना उभारण्यासाठी खर्च मंजूर करण्यास ह्या कंपन्यांच्या भागिदारांना उत्साह वाटेल, असें टाटांच्या वतीनें सांगण्यांत आलें.

गेल्या आठवड्यांत मुंबई येथें मुंबई राज्याचे पब्लिक वर्क्सचे मंत्री डॉ. जिवराज मेहता ह्यांनीं वीज पुरवठा वाढीबद्दल खुलासा केला. तेल शुद्धीचे कारखाने व पेनिसिलिनचा कारखाना ह्यांस लागणारी वीज पुरविण्याची व्यवस्था सरकार निश्चित करील असें त्यांनीं आश्वासन दिलें. सेंट्रल रेल्वेच्या चोला येथील बाष्प शक्तीच्या वीज-कारखान्याची वाढ येत्या ऑगस्ट-सप्टेंबरांत पुरी झाली म्हणजे आज रेल्वेजसाठी खर्च होणारी २४,००० किलोवॅट वीज उपलब्ध होईल. सरकारचा स्वतःचा चोला येथील वीजउत्पादनाचा कारखाना एप्रिल १९५३ मध्यें सुरू होईल; तो ५४,००० किलोवॅट वीज उत्पादन करूं लागेल. म्हणजे, १९५३ च्या मध्याच्या सुमारास मुंबई-पुणें विभागांतील औद्योगिक गरजेच्या दृष्टीनें विजेची परिस्थिति असमाधानकारक रहाणार नाहीं, असा अंदाज आहे. पाण्याच्या शक्तीवर वीज निर्माण करणाऱ्या हैड्रो-इलेक्ट्रिक योजना पुऱ्या होईपर्यंत वाट पहातां येणार नाहीं, म्हणून ट्रॉम्बे येथें एक प्रचंड थर्मल वीज-उत्पादन कारखाना उभारण्याच्या योजनेचा सरकार विचार करीत आहे. हा कारखाना स्थापन झाल्यास १९५५ पासून वीज पुरवूं शकेल, असा अंदाज आहे.

---

• जपानी सल्लागाराची नेमणूक— पूर्व-बंगाल सरकारनें मि. नाकाटा ह्या जपानी तज्ज्ञाची आपला औद्योगिक सल्लागार म्हणून नेमणूक केली आहे. मि. नाकाटा ह्यांनीं आपल्या जागेचें काम करण्यास सुरवातहि केली आहे.

• भारतांत टाइपरायटर्सचा कारखाना—सुप्रसिद्ध रेमिंग्टन रँड ह्या कंपनीनें बंगलोर येथें टाइपरायटर्स व त्यांचे सुटे भाग तयार करण्याचा कारखाना काढण्याचें ठरविलें आहे. ह्या कारखान्यामुळें भारत व आसपासच्या देशांतील टाइपरायटर्सची गरज भागविली जाण्यास चांगली मदत होईल.


( मिरज येथें १९१९ सालीं स्थापन झालेली भागीदारांची जबाबदारी मर्यादित )

# दि मिरज स्टेट बँक लि.

—मिरज—

शेड्यूल्ड बँक

( स्थापना : १९१९ )

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | रु. १५,००,००० |
| विक्रीस काढलेलें व खपलेलें | ... | रु. ११,००,००० |
| रिझर्व्ह व इतर फंडस् | ... | रु. ५,७०,००० |
| एकूण खेळतें भांडवल | ... | रु. ७०,००,००० |

शाखा

★ लक्ष्मेश्वर ( जि. धारवाड )

★ कुर्डुवाडी, पंढरपूर व अकलूज ( पे ऑफिस )

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात. सरकारी रोखे, शेअर्स, सोनें, माल, स्थावर मिळकत वगैरेचे तारणावर कर्ज अगर कॅश क्रेडिट दिलें जातें. समक्ष चौकशी बँकेकडे करावी अगर लिहावें

डॉ. कृ. गो. गोसावी, चेअरमन.

के. डी. शिराळकर मॅनेजर

# पुणें जिल्हा सहकारी खरेदी विक्री संघ लि.

४११ शनवार पेठ, पुणें २.

तारेचा पत्ता:—सॅनको सोप. टेलिफोन नं. ३११५

( जिल्ह्यांतील शेतकरी व नागरी जनतेस दैनंदिन गरजेच्या वस्तु पुरविणें व शेतकऱ्यांचा माल किफायतशीर विकून देणें, या उद्देशानें स्थापन झालेली जिल्ह्यांतील मध्यवर्ती संस्था )

## संस्थेकडे खालीलसाठी लिहा अगर समक्ष भेटा.

★ शेतीचीं सर्व प्रकारचीं अवजारें; ऊंस गाळण्याचे चरक; सल्फेट व इतर खतें; पिकांच्या रोगांवरील औषधें; पेंड.

★ शेतकी खात्यामार्फत जिल्ह्यांत होणारें पेंड, खतें व मिक्श्चर यांचें वांटप या संस्थेमार्फतच करण्यांत येतें.

★ पुणें जिल्हा ग्रामसुधारणा मंडळाच्या विद्यमानें चालू असलेल्या नियंत्रित लोखंड, सिमेंट वांटप योजनेंतील—गाड्यांचे आंस, धांवपट्ट्या, नळीचे पत्रे, प्लेन पत्रे, वगैरे व सिमेंट.

★ ग्राहक सहकारी संस्थांना लागणारा माल संघाच्या अडत दुकानामार्फत पुरविला जातो.

★ शेतकऱ्यांचा शेतीचा माल संस्थेच्या अडत दुकानामार्फत पुणें येथील बाजारपेठेंत किफायतशीर रीतीनें विकून दिला जातो.

★ जिल्ह्याबाहेरील शेतकरी व सहकारी संस्था यांचा माल पुणें बाजारपेठेंत किफायतशीर रीतीनें विकून दिला जाईल.

संस्थेच्या अडत दुकानाचा पत्ता व टेलिफोन नं. ३२०५. } ११५।११६ भवानी पेठ, गूळ आळी, पुणें २.

# अर्थ

बुधवार, ता. १९ मार्च, १९५२





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## कंपनी कायद्यांत सुचविलेल्या सुधारणा

भारत सरकारनें ऑक्टोबर, १९५० मध्यें श्री. सी. एच. भाभा ह्यांच्या अध्यक्षतेखालीं नेमलेल्या कंपनी कायदा कमिटीचा अहवाल नुकताच प्रसिद्ध झाला आहे. डायरेक्टर्स आणि मॅनेजिंग एजंटस ह्यांच्या संबंधांतील शिफारशींशीं कमिटीचे फक्त एक सभासद सहमत नाहींत; बाकी सर्व बाबतींत कमिटीच्या शिफारसी सर्व सभासदांच्या मान्यतेच्या आहेत. त्यामुळें, कमिटीच्या अहवालाचें महत्त्व वाढलें आहे. मुख्य अहवाल २११ पृष्ठांचा असून, त्यास जोडलेल्या इतर बाबींनीं आणखी २७८ पृष्ठें व्यापलीं आहेत. सध्याच्या कायद्यांत दुरुस्त करण्याजोगीं कलमें, त्यांची सुचविलेली दुरुस्ती आणि कांहीं नवीन कलमें, ह्यांचा त्यांत समावेश होतो. अर्थात्, हा खर्डा जसाच्या तसा स्वीकारण्यांत येऊन त्याचें कायद्यांत रूपांतर करण्यांत यावें, अशी कमिटीची कल्पना नाहीं; कमिटीचें मनोगत स्पष्ट करून दाखविणें हाच त्याचा उद्देश आहे.

### १९१३ नंतर सर्वव्यापी अशी पहिलीच पहाणी

१९१३ चा कंपनी कायदा १९०८ च्या इंग्लिश कंपनीज कन्सॉलिडेशन ॲक्टवर आधारलेला होता व साधारणतः त्या कायद्यांतील तरतुदींची ती नक्कल होती. सप्टेंबर, १९३४ मध्यें भारत सरकारनें एका अनुभवी व निष्णात वकिलाकडे हिंदी कंपनी कायद्यांत दुरुस्त्या सुचविण्याचें काम सोपविलें. त्याच्या सूचनांचा खल होऊन १९३६चा दुरुस्तीचा कायदा करण्यांत आला. मॅनेजिंग एजंटस, कंपन्यांचे ताळेबंद व नफा तोटापत्रकें, सेंट्रल बँकिंग चौकशी कमिटीच्या शिफारशींवर आधारलेल्या बँकिंग कंपन्यांबाबत तरतुदी, इत्यादींचा विचार ह्या दुरुस्त कायद्यानें मुख्यतः केला. कंपनी कायद्याच्या प्रत्यक्ष कारभारांत पुढें बरेच गंभीर दोष दिसूं लागले आणि युद्ध व युद्धोत्तर काळांत तर ह्या दोषांचा फारच बभ्रा झाला. कांहीं कंपन्यांच्या मॅनेजिंग एजंटांनीं धुमाकूळ घालून, लिमिटेड कंपन्यांचे व्यवस्थापक म्हणजे समाजकंटक, अशी त्यांची अपकीर्ति होण्याची पाळी आली व वाइटाबरोबर चांगलेंहि भाजून निघूं लागलें. कंपन्यांच्या कारभारांत तातडीनें सुधारणा घडवून आणण्याचें अगत्य सरकारास पटून प्रस्तुत भाभा कमिटीची योजना करण्यांत आली. कमिटीनें आपलें काम अत्यंत कार्यक्षमतेनें, एका वर्षाच्या अवधींत पुरें केलें, ह्याबद्दल तिचें अभिनंदन केलें पाहिजे. इंग्लंडमधील तत्सम कोहेन कमिटीनें अशाच कामास दोन वर्षें लावलीं होतीं. आतां ब्रिटिश सरकारपेक्षा किती तातडीनें भारत सरकार नवा कंपनी कायदा अंमलांत आणतें, हें लवकरच दिसेल.

### कंपन्यांचा आर्थिक जिवनाशीं निकट संबंध

समाजाच्या फार मोठ्या आर्थिक जीवनाचा भाग कंपन्यांच्या कारभारानें व्यापलेला आहे. सरकारी आर्थिक नियंत्रणाचे खालोखाल त्यांचे व्यवहार परिणामकारक होतात. सरकारचें आर्थिक धोरणहि जॉइंट स्टॉक कंपन्यांच्या मार्फतच बहुंशीं अंमलांत यावयाचें असतें. त्यामुळें, धोरणविषयक विशिष्ट प्रश्न हे जरी कंपनी कायद्याच्या कक्षेंत प्रत्यक्ष येत नसले, तरी कित्येकांचा कंपन्यांच्या कारभाराशीं निकटचा संबंध येतो. त्या कारणानें, कंपनी कायदा सुधारतांना त्यांचा विचार अवश्य करावयास पाहिजे. कंपन्यांची उभारणी कशी केली जाते, प्रॉस्पेक्टसविषयीं कायदा काय आहे, काम सुरू करण्यास किमान भांडवल किती आवश्यक असावें, शेअर्स ॲलॉट केव्हां करावे, भागदारांचें कंपन्यांच्या व्यवस्थापकांवर नियंत्रण कसें व किती असावें, डायरेक्टरांचे अधिकार किती, त्यांचें काम काय, त्यांचा कंपनीवर व मॅनेजिंग एजंटावर अधिकार कितपत चालावा, मॅनेजिंग एजंटांची नेमणूक व त्यांच्या कराराच्या अटी, त्यांचे व डायरेक्टरांचे आणि त्यांचे व भागदारांचे परस्पर-संबंध, कंपनीची विलक्षण गैरव्यवस्था झाली तर सरकारास असावे लागणारे चौकशीचे व तपासणीचे अधिकार, कंपनीचे हिशेब ठेवण्याची व ते तपासण्याची पद्धति, भागीदारांपैकीं अल्पसंख्याकांचे हितसंबंध व त्यांस द्यावयाचें संरक्षण, वाइंडिंग अपचे वेळीं भागदारांचे व घेणेकऱ्यांचे अधिकार, कंपनी कायद्याची अंमलबजावणी व गुंतवणुकीचे व्यवहारांवर ठेवावयाचें प्रभावी नियंत्रण, इत्यादि प्रश्न ह्या संबंधांत उपस्थित होतात.

### मूलग्राही तत्त्वें

भाभा कमिटीनें कंपनी कायद्याची आमूलाग्र छाननी करून ज्या सुधारणा सुचविल्या, त्या कांहीं प्रमुख तत्त्वांवर आधारलेल्या आहेत. तीं येथें थोडक्यांत दिलीं आहेत. कंपनीची उभारणी व व्यवस्था ह्या संबंधाच्या कायद्याच्या तरतुदी अशा असाव्यात, कीं त्यामुळें कांहीं किमान दर्जाची वागणूक तरी आवश्यक व्हावी; परंतु त्याबाबत नियम ज्यामुळें धंदा चालविण्यांत अडचणी याव्यात किंवा पुढें येऊं पहाणारा नाउमेद व्हावा, अशा प्रकारचे कडकहि असूं नयेत. कंपनी स्थापन होण्यापूर्वी प्रॉस्पेक्टसमध्यें तपशीलवार माहिती उपलब्ध होणें सक्तीचें व्हावें व अशी माहिती न देणें कडक शिक्षेस पात्र व्हावें. कंपनी कशा रीतीनें चालविण्यांत येत आहे, हें कळण्यास आवश्यक त्या सर्व गोष्टी उघड दिसून येतील, अशा रीतीनें कंपनीचे हिशेब तयार करण्यांत यावेत. व्यवस्थापकांच्या कृत्यांसंबंधीं योग्य मत बनविण्यास सोपें व्हावें, ह्या दृष्टीनें कंपनीच्या सभा बोलाविण्यांत याव्या व चालविण्यांत याव्या. केवळ गुन्हा घडल्यानंतर कंपनीच्या कारभारांत हात घालण्याचा योग्य अधिकाऱ्यांस अधिकार देऊन भागणार नाहीं; भागीदारांच्या हितास बाध येईल अशा रीतीनें कंपनीचा कारभार चालू आहे, असें स्पष्ट दिसून आलें किंवा सार्वजनिक हिताच्या दृष्टीनें कारभारांत हस्तक्षेप करणें जरूर आहे असें सिद्ध झालें, तर कंपनीच्या कारभारांत हात घालण्याचा योग्य अधिकाऱ्यास अधिकार असणें अगत्याचें आहे. कंपनी कायद्याच्या

तरतुदी व त्यानुसार चौकशांचे निष्कर्ष ह्यांच्या अंमलबजावणीसाठी, त्याचप्रमाणें कायद्याच्या परिणामावर सर्वसाधारण देखरेख ठेवण्यासाठी व सार्वजनिक हिताच्या दृष्टीनें राखून ठेवलेले अधिकार उपयोगांत आणण्यासाठी सरकारी राज्यव्यवस्थेंत एखादा विभाग उघडण्यांत येणें जरूर आहे.

### डायरेक्टर्स

डायरेक्टरांच्या संबंधांत कमिटीनें केलेल्या शिफारसी फार दूरगामी महत्त्वाच्या आहेत. डायरेक्टरांचें स्थान हें मोठें वैशिष्ट्यपूर्ण असतें. कंपनीचे ते केवळ एजंटच नव्हे, तर ट्रस्टीहि असतात. डायरेक्टर बोर्डावर व्यवस्थापकांच्या हितसंबंधांचे प्रतिनिधी असले पाहिजेत, त्याचप्रमाणें भागीदारांचेहि प्रतिनिधी असावयास पाहिजेत. परंतु पहिल्यांचा दुसऱ्यांवर वरचष्मा होतां कामा नये. कंपन्यांच्या कामावर देखरेख करावयाची; त्यासाठी जे पुरेसा वेळ व बुद्धि खर्चूं शकतील, अशाच तरतरीत व्यक्तींची, डायरेक्टर म्हणून निवड झाली पाहिजे. ज्या ठिकाणीं रोजची व्यवस्था मॅनेजिंग एजंटांच्या हातीं आहे, अशा कंपन्यांत डायरेक्टरांचा मॅनेजिंग एजंटांवर योग्य अधिकार चालला पाहिजे. इतर डायरेक्टरांना कर्जे मंजूर करणें, करार करणें, मालमत्ता विकणें, भाड्यानें देणें, वगैरेंचा अधिकार, कर्जाच्या मुदतींत वाढ करणें किंवा कर्ज रद्द करणें, कर्ज काढणें, इत्यादि बाबत कायदेशीर अधिकार डायरेक्टरांना असतात व त्यांचा दुरुपयोग झाल्याचीं उदाहरणें आढळतात. अशा दुरुपयोगास आळा घातला पाहिजे. ह्या दृष्टीनेंच कमिटीनें प्रभावी सुधारणा सुचविल्या आहेत.

### डायरेक्टरांची संख्या व दर्जा

पब्लिक कंपनीला किमान ३ व खाजगी कंपनीला किमान २ डायरेक्टर असावेत व कंपनीची डायरेक्टर म्हणून नेमणूक करतां येऊं नये, अशी कमिटीची शिफारस आहे. तिनें ८३ ब कलमास दुरुस्ती सुचविली आहे. मॅनेजिंग एजंटांचींच माणसें ह्या ना त्या मार्गानें डायरेक्टर बोर्डावर येऊन बोर्ड मॅनेजिंग एजंटांचें केवळ बाहुलें बनतें, असें कित्येक वेळेस होतें. दोन तृतीयांश डायरेक्टर भागीदारांचे प्रतिनिधी असावेत; ह्याबद्दल दुमत नाहीं; व त्यांचे वतीनें निवडून येण्यासाठी अशी मंडळी उभी रहाण्यासहि हरकत नाहीं. परंतु, त्यांचा मॅनेजिंग एजंटांशीं असलेला संबंध व त्यांच्या नेमणुकीचा ठराव भागीदारांकडे आगाऊ पाठविण्यांत यावा व त्यांच्या निवडणुकीस किमान८०% मतें (प्रत्यक्ष अथवा प्रॉक्झीनें) पडलीं पाहिजेत, अशीं बंधनें कमिटीनें सुचविलीं आहेत. निवडून येणाऱ्या डायरेक्टरांची लायकी व दर्जा उच्च कसा राहील ह्याबाबत कमिटीनें बराच खल केला. म्हाताऱ्या लोकांनीं जागा अडवून स्वतः कांहीं न करतां इतरांच्या मार्गांत आल्याचीं कितीतरी उदाहरणें कमिटीस आढळून आलीं; म्हणून तिनें ६५ वर्षांची वयोमर्यादा सुचविली आहे. अर्थात, ह्यापेक्षां जास्त वृद्ध असलेले कांहीं डायरेक्टर्स तरण्या डायरेक्टरांपेक्षांहि अधिक तरतरित व तल्लख असूं शकतील. परंतु, कायदा करतांना सर्वसामान्य लोकांना लागू पडणाराच नियम करावा लागतो, हें लक्षांत ठेवलें पाहिजे. सल्लागार म्हणून मात्र अशा म्हाताऱ्या लोकांनीं काम करण्यास कमिटीची हरकत नाहीं. कोणत्याहि डायरेक्टरानें २० पेक्षां ज्यास्त कंपन्यांचे डायरेक्टर असतां कामा नये, अशी कमिटीची शिफारस आहे. इतर देशांतील कंपन्यांच्या डायरेक्टरांबाबत तपशीलवार चौकशी केली, तेव्हां फारच थोड्या देशांत त्याच त्याच व्यक्ती फार कंपन्यांत डायरेक्टर असल्याचें आढळलें. भारतांतील परिस्थिति भिन्न आहे. म्हणजे, तज्ज्ञ डायरेक्टरांच्या मार्गदर्शनाचा फायदा हवा असेल, तर त्यांच्या डायरेक्टरशिपवरील बंधन फार कडक असून भागणार नाहीं. म्हणून, कमाल २१ कंपन्यांचे डायरेक्टर एकाच वेळीं असण्यास कमिटीनें मान्यता दिली आहे. कोणत्या कारणांमुळें डायरेक्टरची डायरेक्टर रहाण्याची लायकी नष्ट व्हावी व कोणते हितसंबंध त्यानें स्पष्ट करून सांगावें, ह्याबाबतहि कमिटीनें डायरेक्टरांचा दर्जा वाढविण्याचे दृष्टीनें सूचना केल्या आहेत.

### डायरेक्टर्स–मॅनेजिंग एजंटस संबंध

डायरेक्टर्स व मॅनेजिंग एजंटस ह्यांपैकीं डायरेक्टर्स ह्यांचे अधिकार हे केव्हांहि वरिष्ठ असले पाहिजेत, असा कमिटीचा आग्रह आहे. कंपन्यांच्या व्यवस्थेसाठी लागणारे आर्थिक व कारभारविषयक अधिकार डायरेक्टरांकडेच राखून ठेवले पाहिजेत आणि डायरेक्टरांनीं ते मॅ. एजंटांना दिले तरच ते मॅ एजंटांना वापरतां यावेत, कांहीं विशिष्ट अधिकार तर मॅ. एजंटांना डायरेक्टरांनीं कधींच देऊं नयेत, अशी कमिटीची सूचना आहे. डिबेंचर्स काढणें, शेअर्सवरील भरणा न झालेल्या पैशाची कॉल्स करून भागीदारांकडून मागणी करणें, बोर्डाच्या सभेंत ठराव करून डायरेक्टरांनीं जी मर्यादा घालून दिली असेल तिच्याबाहेर कर्जाऊ रकमा घेणें, कंपनीचे पैसे गुंतविणें आणि बोर्डाच्या सभेंत अगोदर ठरविलेल्या मर्यादेबाहेर कर्ज देणें, हे अधिकार डायरेक्टरांनीं कांहीं झालें तरी मॅ. एजंटांना देतांच कामा नयेत, अशा तरतुदी कमिटीनें सुचविल्या आहेत. कंपनीच्या कारभारांत डायरेक्टरांचें अत्यंत महत्त्वाचें स्थान असलें, तरी कांहीं अधिकार साधारण सभेसच उपयोगांत आणतां यावेत व डायरेक्टरांच्या कांहीं अधिकारांवर निश्चित बंधनें असावीं, असेंहि कमिटीनें कटाक्षानें सांगितलें आहे.

### मॅनेजिंग एजन्सी पद्धतींतील दोष टाळून ती राबविण्याचें महत्त्व

मॅनेजिंग एजन्सीच्या पद्धतींतील दोषांची पुष्कळच चर्चा झालेली आहे, परंतु सध्याची भारतांतील औद्योगिक संघटना बरीच प्राथमिक अवस्थेंतच आहे, आणि मॅनेजिंग एजन्सी पद्धतींतील दोष विचारांत घेतले तरी सुद्धां एकूण विचार करतां ती पद्धत टाकून देऊन भागणार नाहीं असें कमिटीचें मत आहे. खाजगी औद्योगिक प्रयत्नांस उत्साहपूर्व चालना मिळत रहावी, ह्या दृष्टीनें मॅनेजिंग एजन्सी पद्धतींत सुधारणा कोणत्या व कशा कराव्या, एवढाच तूर्त प्रश्न आहे. त्या पद्धतींतील रुजलेले दोष तात्काळ दूर केले पाहिजेत आणि मॅनेजिंग एजंटांनीं आपलें काम उत्साहानें, कार्यक्षमतेनें व दूरदृष्टीनें केलें पाहिजे. तरच, ह्या पद्धतीचा उपयोग आहे. चालू असलेले दोष व दुष्टाचार ह्यांचें मॅनेजिंग एजन्सी पद्धतींतून शक्य तों उच्चाटन कसें करतां येईल, ह्याचा विचार कमिटीनें केला आहे. मॅनेजिंग एजंटांची नैतिक पातळी कायद्यामध्यें केवळ तरतुदी करून सुधारणार नाहीं, हें उघड आहे. मॅनेजिंग एजंटांची नेमणूक, त्यांचे करार, त्यांचें वेतन, त्यांचे अधिकार, त्यांचा कारभार, इत्यादिबाबत चालू कंपनी कायद्यांत कमिटीनें सुधारणा सुचविल्या आहेत.

### कमिटीचे सेक्रेटरी इंग्लंड–अमेरिकेकडे रवाना

कमिटीचा अहवाल राज्यसरकारें व व्यापारी आणि कायदाविषयक संस्था ह्यांचेकडे पाठविण्यांत आला असून त्यांचीं मतें मागविण्यांत आलीं आहेत. कमिटीचे सभासद–चिटणीस श्री. मुजुमदार ह्यांना ग्रेट ब्रिटन व अमेरिका येथील कंपनी कायद्याच्या तरतुदींचा व अंमलबजावणीचा अभ्यास करण्यासाठी परदेशीं पाठविण्यांत आलें आहे.

### ॲस्ट्रॉनॉटिक्स–अंतराळीं प्रवासाचें नवें शास्त्र

पृथ्वीच्या वातावरणाचे पलीकडे, इतर ग्रहांचेकडे प्रवास करण्याच्या अभ्यास चें ॲस्ट्रॉनॉटिक्स हें नवें शास्त्र आहे. पूर्वी जें स्वप्न वाटत होतें, तें ह्या शास्त्राच्या प्रगतीमुळें सत्यसृष्टींत उतरण्याची आशा वाटत आहे गॅलिलिओच्या शोधांत ह्या शास्त्राचें मूळ आहे. आतां चंद्रावर स्वारी शक्य वाटूं लागली आहे आणि दोन–तीनच पिढ्यांचे अवधींत मनुष्यप्राणी तेथें कदाचित उतरूं शकेल. त्यापूर्वी, निर्मनुष्य रॉकेट तेथें पोंचण्याची पुष्कळच शक्यता आहे. राडारचे सहाय्यानें २,४०,००० मैल दूर संदेश पाठवून त्याचा प्रतिध्वनि नोंदला गेला आहे. केवळ साधे डोळे व टेलिस्कोप एवढ्याच सामुर्थावर आतां आपणांस भिस्त ठेवून रहाण्याचें कारण नाहीं. रॉकेटच्या सहाय्यानें आपण अंतर प्रत्यक्ष तोडूं शकूं. पृथ्वी सोडून अंतराळांत प्रवास करतां येण्यासाठीं दोन गोष्टींची आवश्यकता असते:— (१) पृथ्वीचें गुरुत्वाकर्षण सोडून अंतराळांत जातां आलें पाहिजे व (२) तेथें पोंचल्यानंतर हवा नसलेल्या अंतराळांत प्रवास करण्याचें साधन पाहिजे.

गुरुत्वाकर्षणाशीं आपला परिचय आहेच. त्याखेरीज आपण जगूंच शकलों नसतों. गुरुत्वाकर्षणामुळेंच पृथ्वीचे भोंवतीं हवेचें घट्ट वेष्टन आहे. वरवर जावें, त्या मानानें गुरुत्वाकर्षणाचा जोर कमी कमी होत जातो. २५० मैल उंचीवर तो जोर समुद्रसपाटीशीं असलेल्या जोराचे मानानें फक्त १०% कमी होतो. पण १२,००० मैल उंचीवर १ शेर वजनाचा जिन्नस फक्त १ छटाकच भरेल. म्हणजे, पृथ्वी सोडून जाणें कठीण आहे, पण एकदा दूर गेल्यावर नंतरचा प्रवास अवघड नाहीं. सर ऐझॅक न्यूटनच्या क्रिया–प्रतिक्रियेच्या सिद्धांतावरच रॉकेटचें तत्त्व आधारलेलें आहे. अजिबात हवा नसेल, तर रॉकेटची गति पुष्कळच वाढेल. एंजिनाचें वजन किंवा आकार लहान असला, तरी रॉकेट फार मोठी शक्ति निर्माण करते, म्हणून अंतराळांत प्रवास करण्यास रॉकेट हें फार सोइस्कर साधन आहे. त्यामुळें, गुरुत्वाकर्षणाच्या जोरास प्रतिकार करण्याचें रॉकेटचें सामर्थ्यहि मोठें असतें. पृथ्वीच्या तावडीतून सुटावयाचें, तर रॉकेटला दर ताशीं २५,००० मैल वेग प्राप्त व्हावयास हवा. हा वेग आज अशक्य कोटींतील वाटेल, पण १९४० सालीं १,००० मैल वेग शक्य झाला होता तर १९५० मध्यें ५,००० मैल वेगापर्यंत प्रगति प्रत्यक्षपणें झालेली आहे. तेव्हां, ह्यापुढीलाहि प्रगति सत्वर होईल अशी अपेक्षा आहे.

रॉकेटबाबत सर्वच उद्योग-प्रगत देशांत संशोधन चालू आहे. विमानें जमिनीवरून सुटणें अधिक सोपें व्हावें, विमानांचा वेग वाढावा व तीं मोठ्या उंचीवरून चालवितां यावींत, उंचीवरील संशोधन त्याची सामुग्री इच्छेप्रमाणें उंच फेकून शक्य व्हावें, अशा योजनेप्रमाणें टाकतां यावें त, इत्यादि बाबी आतां तातडीच्या महत्त्वाच्या समजल्या जाऊं लागल्या आहेत. कांहीं काळानें, रॉकेट ॲटॉमिक शक्ति वापरूं लागतील, अशीहि शक्यता आहे.

कांहीं पिढ्यानंतर, पृथ्वीभोंवतीं मनुष्य–निर्मित 'उपग्रह' शक्य कोटींत उतरेल. त्या 'उपग्रहा'वर, हवेच्या वातावरणापलीकडे, विज्ञान व खगोल शास्त्रज्ञांसाठीं संशोधन शाळा स्थापन करतां येईल. तेथून हवामान शास्त्रज्ञांना पृथ्वीच्या हवाविषयक घडामोडींचें निरीक्षण करतां येईल. रेडिओ रिले स्टेशन तेथें उभारून टेलिव्हिजनचा जगभर फायदा देतां येईल. अर्थात, ह्या सर्वांचे पाठोपाठ शत्रूची टेहळणी करण्याचें लष्करी केंद्र तेथें येणारच !

### सबंध घटप्रभा योजनेची कर्नाटकाची मागणी

कर्नाटक प्रदेश कॉं. कमिटी आणि कर्नाटकानें निवडून दिलेले नवे पार्लमेंटचे व मुंबई विधिमंडळाचे सभासद ह्यांची संयुक्त बैठक हुबळी येथें भरली होती. तिला शेती खात्याचे मंत्री श्री. एम. पी. पाटील उपस्थित होते. पंचवार्षिक योजनेंत सबंध घटप्रभा योजनेचा समावेश करण्याची मागणी करणारा ठराव सभेनें मंजूर केला. घटप्रभेवरील धरणवजा बंधारा आधींच अस्तित्वांत आहे; त्यांतून मिळूं शकणारें पाणी दूरवर नेऊन पोंचविण्यासाठी डाव्या तीरावर ४४ मैल लांब कालवे बांधण्याचें काम हातीं घेण्यांत आलें आहे. परंतु, पैशाचा तुटवडा पडल्यामुळें १८ मैलांचेंच काम आधीं करावयाचें ठरलें आहे. सबंध कालव्यासाठी थोडा काळ थांबावें लागणार आहे. ही सबंध योजना ५½ कोटी रुपयांची आहे. योजनेच्या दुसऱ्या भागांत शेटी हळळी व आजरे येथें धरणें बांधणें आणि उजव्या तीरावर कालवा काढणें हीं कामें घेतील व त्यास १० कोटी रुपये खर्च येईल.

### कोयना योजनेची एकमुखानें मागणी

कोयना हैड्रो–इलेक्ट्रिक योजना व इतर शेती–पाणी–पुरवठा योजना पंचवार्षिक योजनेंत समाविष्ट करण्याची मागणी हेळवाक येथील कोयना परिषदेनें एकमुखानें केली. प्लॅनिंग कमिशनपुढें ती मांडण्यासाठी महाराष्ट्र प्रदेश कॉं. कमिटीचे अध्यक्ष श्री. हिरे, प्रो. धनंजयराव गाडगीळ व श्री. शंकरराव किर्लोस्कर ह्या तिघांचें शिष्टमंडळ पाठविण्याचें ठरलें. परिषदेंतील ठरावांस सर्व पक्षांच्या पुढाऱ्यांनीं पाठिंबा दिला.

### बँक ऑफ चायनाची ल्हासा बँक

बँक ऑफ चायनानें ल्हासा येथें आपली शाखा उघडली असल्याचें पेकिंग रेडिओनें जाहीर केलें आहे.


## दि बँक ऑफ महाराष्ट्र लिमिटेड

—स्थापना १९३५—

( शेड्यूल्ड बँक )

**भांडवल**

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल ... ... | रु. ५०,००,००० |
| विक्रीस काढलेलें व खपलेलें भांडवल | रु. ३१,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल ... ... | रु. १६,००,००० |
| रिझर्व्ह व इतर फंड ... ... | रु. ५,६५,००० |
| एकूण खेळतें भांडवल ... ... | रु. १ कोटींचे वर |

गतवर्षाकरतां पूर्वीप्रमाणें पांच टक्के

करमाफ डिव्हिडंड

बँकेनें जाहीर केलें आहे.

★ बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात. ★

मुख्य कचेरी : लक्ष्मी रोड, पुणें २

चिं. वि. जोग
मॅनेजर.

### पगारांतील कपात रद्द करण्याचा निर्णय

मध्यवर्ती सरकारची गेल्या दोन वर्षांची अंदाजपत्रकें शिल कीची झाल्यामुळें वरिष्ठ वर्गातील नोकरांच्या पगारांत करण्यांत आलेली कपात रद्द करण्यांत येणार असल्याचें समजतें. १ नोव्हेंबर १९४९ रोजीं भारताच्या गव्हर्नर जनरलनें आपल्या नियम करण्याच्या अधिकारांखालीं असा आदेश दिला होता कीं, ज्या वरिष्ठ नोकरांना मासिक ३,००० रुपयांच्यावर पगार मिळत असेल त्यांनीं आपल्या पगारांत आपखुशीनें कपात करून घ्यावी. मध्यवर्ती सरकारचे मंत्री आणि राज्यांचे मंत्री ह्यांनींहि आपल्या पगारांत १५ टक्के कपात खुशीनें करून घेतली होती. पगारांत करण्यांत आलेली ही कपात १९५१ च्या फेब्रुवारीअखेर चालू राहील असा अंदाज होताच. पण त्यानंतर मात्र ती रद्द करण्यांत आली आहे. मध्यवर्ती सरकारच्या ज्या नोकरांना दरमहा ३,००० रुपयांपेक्षां कमी वेतन मिळत असे, त्यांच्यावरहि प्रॉव्हिडंड फंडासारख्या निधींत वर्गणी घालण्याचें बंधन घालण्यांत आलें होतें. पगार कपातीच्या व इतर योजनेंत आय. सी. एस. मधील नोकर, रेल्वेंतील नोकर-वर्ग, करारान्वयें नेमण्यांत आलेले नोकर, इत्यादींचा समावेश करण्यांत आला होता. आशिया खंडाच्या बाहेरून आणण्यांत आलेल्या नोकरांना मात्र ही पगार कपात लागू नव्हती. अशा नोकरांत मुख्यतः कुशल तंत्रज्ञांचाच भरणा अधिक होता. भारतीय सरकार या ताज्या अंदाजपत्रकांत पगारकपातीचा निर्देश करण्यांत आलेला नाहीं. तेव्हां, मार्च महिन्याचे, वरिष्ठ नोकरवर्गाचे पगार पूर्ण दिले जातील असें दिसतें. विधिमंडळांत अंदाजपत्रकावर जी चर्चा करण्यांत आली, तींत पगार कपात रद्द झाल्याची बाब कोणाच्या लक्षांत आलेली दिसत नाहीं, किंवा नवीन लोकसभेची बैठक अजून भरावयाची असतांना जुन्या विधिमंडळानें ह्या बाबीवर विचार करणें योग्य होणार नाहीं, असेंहि सभासदांना वाटलें असेल.

### उत्तर-प्रदेशांत सिनेमागृहवाल्यांची संघटना

उत्तर-प्रदेशांतील सिनेमा-गृहांच्या मालकांनीं एक संस्था स्थापन करून ती फिल्म फेडरेशन ऑफ इंडिआ ह्या मध्यवर्ती संघटनेला जोडून घेतली आहे. त्या राज्य-सरकारच्या पब्लिक वर्क्स खात्याचे मंत्री मि. हफीझ मोहमद इब्राहिम ह्यांनीं संस्थेचें उद्घाटन केलें.

मि. हफीझ इब्राहीम म्हणाले कीं बोलपटाच्या धंद्यांत जितकें भांडवल गुंतलेलें आहे त्यापैकीं ६० टक्के भांडवल उत्तर-प्रदेशानें पुरविलेलें आहे. ह्या धंद्यांत जे कलावंत आहेत, त्यापैकीं ९० टक्के कलावंत उत्तर-प्रदेशीय आहेत. ७२ टक्के निर्मातेहि उत्तरप्रदेशीय आहेत. भारतीय संस्कृति उंचावणाऱ्या बोलपटांची आज जरूर आहे, असें मत त्यांनीं व्यक्त केलें. श्री. चंदुलाल शहा आपल्या भाषणांत म्हणाले कीं, सिनेमामुळें समाजाची सुधारणा होण्यास मदत होते, कारण आपला रिकामा वेळ सिनेमा पाहण्यांत घालविल्यामुळें लोकांना उपद्व्याप करण्यास फुरसतच मिळत नाहीं.

उत्तर प्रदेशांत करमणुकीवरील कर ३० टक्के आहे. तो इतर राज्यांप्रमाणें २५ टक्केच घेण्यांत यावा अशी विनंति करण्याचा ठराव परिषदेनें मंजूर केला. दुसऱ्या एका ठरावानें अशी विनंति करण्यांत आली कीं, म्युनिसिपल बोर्डांनीं परवाना-फी घेण्याची जी पद्धत पाडली आहे ती रद्द करण्यांत यावी. ह्या पद्धतीनें सरकारी कर व म्युनिसिपल कर असा दुहेरी कर सिनेमागृहाच्या चालकांना द्यावा लागतो, इकडे लक्ष वेधण्यांत आलें आहे.


ठेवी स्वीकारण्यांत येतात

ठेवींवर दरसाल दर शेंकडा ७॥ रुपये व्याज दिलें जातें. व्याज दर तीन महिन्यांनीं दिलें जातें. ठेवीदारास ठेवीची मुदत संपण्यापूर्वी आपली रक्कम परत पाहिजे असल्यास एक महिन्याच्या आगाऊ नोटिसीनें केव्हांही व्याजासह परत मिळूं शकते.

पेडणेकर आणि कंपनी लिमिटेड

शिवण्याच्या यंत्रांचे व्यापारी,

१७२, गिरगांव रोड, मुंबई ४

टेलिफोन २२७३८ तारेचा पत्ता: 'PEDNECO' Bombay

दि व्हल्कन इन्शुअरन्स कं. लि.

—पुणें शाखा—

१७९, कर्वे बिल्डिंग, लक्ष्मी रोड.

आग, मोटार, अपघात व वर्कमेन्स कॉंपेन्सेशन ह्यांचे विमे स्वीकारणारी प्रमुख स्वदेशी कंपनी.

एजन्सी व इतर माहितीसाठीं चौकशी करा :

ब्रँच सेक्रेटरी.






'अर्थ' ग्रन्थमाला

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार

## पौंड बळकट करणारें ब्रिटनचें अंदाजपत्रक

ता. ११ मार्च रोजीं पार्लमेंटला अर्थमंत्री मि. बटलर यांनीं सादर केलेल्या अंदाजपत्रकाचा मुख्य उद्देश पौंड मजबूत करणें हा आहे. आपला उद्देश ब्रिटनची अंतर्गत व्यापाराची परिस्थिति सुधारून पौंडाबद्दल जगांतील राष्ट्रांचा विश्वास संपादन करणें हा आहे, असें आपल्या भाषणांत मि. बटलर म्हणाले. ३१ मार्च अखेर करांचें उत्पन्न ४४४ कोटी पौंड होईल व खर्च ४०७ कोटी पौंड होईल. खर्च अंदाजापेक्षा १२ कोटी पौंड कमी असेल. व उत्पन्नहि मूळच्या अंदाजापेक्षा २० कोटी पौंडांनीं वाढलें आहे. दृश्य जमाखर्चाचे आंकडे असे असतांना ब्रिटनची अंतर्गत आर्थिक परिस्थिति खालावत चालली आहे. याचें कारण आयात मालाची किंमत वाढत असून निर्यात माल त्याला तोंड देऊं शकत नाहीं. यामुळें वर्षअखेर व्यापारी देण्या-घेण्यांत मूळच्या अंदाज चुकून ४० कोटी पौंडांची तूट येणार आहे. जस्त, रबर व लोंकर यांच्या किंमती १९५१ मध्यें उतरत असल्यामुळें राष्ट्रकुटुंबांतील देशांना नुकसान सोसावें लागत आहे. परंतु याचवेळीं याहि देशांची आयात वाढत असल्यामुळें त्यांना व्यापारांत तोटाच सोसावा लागतो. स्टर्लिंग गटाची सोनें व डॉलर यांमधील शिल्लक १९५१ च्या उत्तरार्धापासून घटत चालली आहे, व ही स्थिति तशीच राहूं दिल्यास ब्रिटनला १९५२ अखेर नेहमींचें अन्न व रोजगारी आणि उत्पादन यांना आवश्यक असा कच्चा माल खरेदी करतां येणार नाहीं. गेल्या जून पासून सोनें व डॉलर यांतील शिल्लक २०० कोटी डॉलर्सनीं घटून आतां फेब्रुवारी अखेर ती १७७ कोटी डॉलर्स किंवा ६३ कोटी पौंड उरली आहे. राष्ट्रकुटुंबांतील देशांनीं याबाबतींत परिस्थिति १९५२ च्या उत्तरार्धांत सुधारण्याचें एकमतानें ठरविलें आहे, यामुळें ब्रिटनला आजच्या परिस्थितींतून मार्ग काढणें सुकर झालें आहे. आजच्या कार्यक्रमाप्रमाणें १९५२ अखेर राष्ट्रकुटुंबांतील देश बाकीच्या जगाशीं शिल्लक दाखविणारा व्यापार करूं शकतील. ब्रिटनहि १९५२ मध्यें सर्व प्रकारच्या आयातींत १० टक्के कपात करून ती ३१५ कोटी पौंडांपर्यंत आणील. परंतु हें करतांना उद्योगधंद्यांच्या आवश्यक गरजांकडे लक्ष पुरविलें जाईल व रोख्यांची किंमतहि योग्य प्रमाणाबाहेर उतरणार नाहीं याकडे लक्ष पुरविलें जाईल. अन्नविषयक गरजा आयातीनें भागविता याव्यां यासाठी पश्चिम युरोपांतील देशांकडून होणाऱ्या आयातींत कपात केली जाणार नाहीं. परराष्ट्रीय व्यापारांतील तूट भरून काढण्यासाठी पुढील वर्षी ब्रिटनला आपली सर्व प्रकारची निर्गत ६० कोटी पौंडांनीं वाढवावी लागेल. जलवाहतूक, विमा व तेल या अदृश्य आयातींत कांहीं वाढ होईल. अदृश्य आयात एकंदर २० ते २५ कोटी पौंड होऊन १९५२ मध्यें ब्रिटनला १९५१ च्या मानानें अनुकूल अशी व्यापारी परिस्थिति निर्माण होईल. निर्गत व्यापारांत प्रत्यक्ष वाढ निदान ५० कोटी पौंडांची साधावी लागेल. अमेरिकेकडून जादा पोलाद मिळेल व निर्गतीच्या दृष्टीनें उत्पादनाला चालना मिळेल. अंतर्गत खपाच्या मालाचें उत्पादन कमी करावें लागेल. यासाठी भांडवल-गुंतवणुकीचें प्रमाण कमी व्हावें म्हणून बँक ऑफ इंग्लंडनें बँकरेट २½ टक्के होता तो ४ टक्के केला आहे.

१९५२-५३ सालीं अंदाजीं सामान्य खर्च ४२४ कोटी पौंड होईल व चालू करांप्रमाणें अंदाजीं उत्पन्न ४७७ कोटी पौंड होऊन शिल्लक सुमारें ५३ कोटी पौंड राहील. मालाचा अंतर्गत


**सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक, लि.** (स्थापना १९१८)

शाखा : दरमहा १ रु. पासून १००

१ दादर रुपयांपर्यंत हप्त्याची

२ माहीम बचत योजना. व्याज ३ ते ३½ टक्के.

३ बेळगांव हेड ऑफिस- गिरगांव, मुंबई.

४ पुणें—सोमवार पेठ, सारस्वत कॉलनी, पुणें.


खप वाढणार नाहीं याकडे विशेष लक्ष पुरविलें जाईल. या उद्देशानेंच पुढील गोष्टी सुचविण्यांत आल्या आहेत. अन्नविषयक दिली जाणारी मदत ३३ टक्क्यांनीं कमी करण्यांत येईल व त्यामुळें १६ कोटी पौंड वांचतील. परंतु यामुळें अन्नविषयक कांहीं आवश्यक पदार्थांच्या किंमती वाढून दर व्यक्तीमागें आठवड्याला दीड शिलिंग खर्च जास्त येईल. चहावरील मदत अजिबात रद्द करून किंमत आवश्यक प्रमाणांत वाढविली जाईल. मध्यम व सामान्य लोकांना, अन्नावरील मदत कमी करावी लागल्यामुळें परिस्थितीला तोंड देण्यासाठी व जास्त प्रमाणांत निर्गत शक्य करण्यासाठी नेटानें व जास्त वेळ काम करावें लागेल. परंतु करांच्या बाबतींत समतोलपणा राखण्यासाठी २० लक्ष लोकांना आज द्यावा लागणारा प्राप्तीकर द्यावा लागणार नाहीं. तसेंच नफ्यावरील कर, जादा नफ्यावरील ३० टक्के किंवा एकंदर नफ्यावरील १८ टक्के या दोहोंत जो कमी असेल तो आकारला जाईल याची आकारणी १ जानेवारी पासून होईल व याचा उद्देश सर्वांना कर-भार समप्रमाणांत सोसावा लागावा व कोणालाहि शस्त्रास्त्रांच्या वाढीमुळें वाजवीपेक्षां जास्त नफा मिळूं नये, हा आहे. विवाहित कुटुंबांना १६ वर्षांखालील मुलांमागें मिळणाऱ्या सरकारी भत्त्यांत ३ शिलिंगाची वाढ होऊन तो ५ शिलिंगांऐवजीं ८ शिलिंग दिला जाईल, याचा फायदा १० लक्ष लोकांना मिळेल.

मि. बटलर यांच्या वरील आशयाच्या नवीन अंदाजपत्रकाचा उद्देश लोकांना जास्त कार्यप्रवृत्त करणें हा दिसतो. अन्नविषयक मदत जरी कमी करण्यांत येणार आहे व त्यामुळें कांहीं वस्तूंच्या किंमती वाढतील हें संकट ओढवणार आहे, तरी त्याच बरोबर १६ वर्षांच्या आंतील मुलांच्या भत्त्यांत दर आठवड्याला मुलामागें ३ शिलिंग या प्रमाणांत वाढ होणार आहे. ही एक प्रकारची सवलत आहे. तसेंच प्राप्तीकरापासून २० लक्ष लोकांना मुक्त करण्यांत येईल हीहि मोठी सवलत आहे. अंदाजपत्रकाचा मुख्य उद्देश लोकांनीं आपला सर्व प्रकारचा अंतर्गत खर्च शक्य होईल तितका कमी करावा, व त्याचवेळीं निर्गतीसाठी उत्पादनांत वाढ करावी असा आहे. ब्रिटनची अंतर्गत परिस्थिति मि. बटलर यांच्या मतें अपुऱ्या किंवा मर्यादित अर्थानें समाधानकारक आहे, परंतु पुढची सर्व मदार केवळ निर्गत व्यापार-वाढीवर अवलंबून असल्यामुळें अगदीं अनिश्चित स्वरूपाची आहे. याच परिस्थितीला तोंड देणें व त्यासाठी पौंड मजबूत करणें हा त्यांच्या अंदाजपत्रकाचा मुख्य उद्देश आहे व तो १९५२ अखेर राष्ट्रकुटुंबांतील देशांच्या सहकारानें साधतां येईल असा त्यांचा विश्वास आहे. हुजूर पक्षानें हें अंदाजपत्रक केलें असलें तरी करांच्या बाबतींत समतोलपणा राखण्याकडेच यांची दृष्टि आहे. गरीब लोकांच्या राहाणीचा खर्च अन्नविषयक मदत बंद केल्यामुळें वाढेल, ही एकच गोष्ट कांहींना योग्य वाटणार नाहीं.

## स्टर्लिंग गटांतील देशांच्या परिस्थितीचें पृथःकरण

स्टर्लिंग गटांतील देशांचे आंतरराष्ट्रीय व्यापारांतील महत्त्व निरनिराळ्या देशांशीं पौंडाच्या साहाय्यानें व्यापार करण्याच्या शक्तीवर अवलंबून आहे. सोनें हें याप्रकारें उपयुक्त आहे व गेलीं कांहीं वर्षे अमेरिकेच्या डॉलरलाहि असेंच महत्त्व प्राप्त झालें आहे. पौंडाचा उपयोग परस्पर देवघेवींसाठी ब्रिटिश राष्ट्रकुटुंबांत समाविष्ट होणाऱ्या कॅनडाखेरीज इतर सर्व देशांशीं होऊं शकतो. पौंडाला राष्ट्रकुटुंबांतील देशांत मजबुती येण्याचें कारण हें कीं ब्रिटनला लागणाऱ्या मालापैकीं ४० टक्के किंमतीचा माल स्टर्लिंग गटांतील म्हणजेच राष्ट्रकुटुंबांतील देशांतूनच आयात होतो. स्टर्लिंग गटांतील एखाद्या देशाला व्यापारांत तफावत आली तर ती सोनें किंवा डॉलर यांच्या व्यतिरिक्त अंतर्गत परस्पर व्यापारानें भरून काढतां येते. जागतिक व्यापाराचा ३० टक्के व्यापार स्टर्लिंग गटांतील देशांचा एकमेकांशीं होतो. आपला व्यापार टिकवून धरण्यासाठी या गटांतील देशांनीं आपली मध्यवर्ती शिल्लक स्थापन केली आहे. या शिलकीचा उपयोग तुटीच्या व्यापाराचे वेळीं मदत म्हणून होऊं शकतो. यामुळें एखाद्या देशावर तात्पुरतें संकट ओढवलें असतां तें शिलकींतील मदतीमुळें दूर करतां येतें, व याचा संभाव्य अनिष्ट परिणाम त्या व इतर देशांच्या जागतिक व्यापारावर होऊं शकत नाहीं. स्टर्लिंग गटांतील देशांनीं आपली परराष्ट्रीय व्यापारांतील मजबुती टिकवून धरण्यासाठी व दृढ करण्यासाठी युरोपांतील ऑस्ट्रिया, झेकोस्लोव्हाकिया, डेन्मार्क, फिन्लंड, जर्मन फेडरल रिपब्लिक, ग्रीस, इटली व इटलीच्या चलनकक्षेंतील प्रदेश, पोलंड, रशिया, स्पेनच्या कक्षेंतील प्रदेश, स्वीडन व बाकीच्या जगांतील सुडान, चिली, थायलंड, या देशांशीं १९४७ पासून त्यांना मिळणाऱ्या स्टर्लिंगच्या स्टर्लिंग गटांतील इतर देशांशीं व्यापारी हिशेबाच्या फेडीसाठीं उपयोग करावयास परवानगी दिली आहे. या पद्धतीला हिशेब बदलण्याची पद्धति म्हणतात. स्टर्लिंग या प्रकारच्या पद्धतीनें मजबूत करणें हा ब्रिटिश सरकारचा उद्देश आहे. या दृष्टीनें राष्ट्रकुटुंबांतील देशांच्या अर्थमंत्र्यांचें संशोधन चालूं आहे. युरोपांतील राष्ट्रांच्या परराष्ट्रीय व्यापारांतील पैशांच्या फेडीसाठी स्थापन झालेल्या युरोपियन पेमेंट्स युनियनचा ब्रिटन सभासद असून त्यामुळेंहि जागतिक व्यापाराला मदत झाली आहे. लंडन येथून स्टर्लिंगमधून देणें फेडतां येत असल्यामुळें या पद्धतीमुळें युरोपांतील देशांचा फायदा झाला आहे.

पौंड मजबूत रहाण्यासाठी बाकीच्या देशांशीं स्टर्लिंग गटांतील देशांना व्यापारी शिल्लक राखतां आली पाहिजे. दुसऱ्या महायुद्धाच्या अखेरपासून तीन वेळां ही शिल्लक रोडावली. असा तिसरा प्रसंग अगदीं अलीकडे आला आहे. स्टर्लिंग गटाची पौंडांतील शिल्लक १९५१ च्या दुसऱ्या सहामाहींत १३८ कोटी पौंड होती. ती १९५१ अखेर ८३ कोटी पौंड झाली. ह्या वेळीं केवळ डॉलर गटांतील देशांशींच नव्हे तर सर्व जगाशींहि व्यापारी तूट आली आहे. यामुळें हा प्रसंग १९४९ च्या पौंडाच्या अवमूल्यनाच्या प्रसंगाहून जास्त कठिण आहे. याला तोंड देण्यासाठीं परदेशाच्या आयातीवर मोठा निर्बंध, व अंतर्गत उत्पादन-वाढ साधून निर्गत व्यापार वाढवून पौंड मजबूत करणें, या गोष्टींवर भर द्यावा लागणार आहे.


स्थापना १९३६

**युनायटेड वेस्टर्न बँक, लिमिटेड, सातारा**

[ शेड्यूल्ड बँक ]

*पॅलेस स्ट्रीट, सातारा.*

शाखा—मुंबई फोर्ट, मुंबई गिरगांव, पुणें, नाशिक व बार्शी.

ता. ३०-६-५१ अखेर

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | १०,००,००० |
| वसूल भांडवल | रु. | ६,४३,७६० |
| रिझर्व व इतर फंड्स | रु. | १,६५,००० |
| ठेवी | रु. | ६७,११,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | ७९,००,००० |

मुदत ठेवीवरील व्याजाचे दर :

| १ वर्ष | दोन वर्षे | तीन अगर अधिक वर्षे |
|---|---|---|
| रु. १-८-० | रु. २-११-० | ३ रुपये |

| | | |
|---|---|---|
| सेव्हिंग्ज बँक | दरसाल दर शेंकडा | १-८-० |
| सेव्हिंग्ज डिपॉझिट | " | १-०-० |
| चालू डिपॉझिट | " | ०-८-० |

*सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.*

सी. ह. जोशी, बी. ए., बी. कॉम्., मॅनेजर.
एस. एन. साठे, बी. ए., एलएल. बी., चेअरमन

दि

**युनायटेड कमर्शिअल बँक लि.**

कलकत्ता.

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | ८ कोटी रु. |
| खपलेलें भांडवल | ... | ४ कोटी रु. |
| वसूल भांडवल | ... | २ कोटी रु. |
| रिझर्व्ह फंड | ... | ६७½ लक्ष रु. |

: बोर्ड ऑफ डायरेक्टर्स :

जी. डी. बिर्ला ( चेअरमन )

ईश्वरीप्रसाद गोएंका, व्हाइस चेअरमन
रमणलाल जी. सरय्या, व्हाइस चेअरमन
अनंत चरण लॉ
महादेव एल. डहाणूकर
बैजनाथ जालन
मदनमोहन आर. रुइया
गोविंदलाल बंगूर
मोहनलाल एल. शहा
पी. डी. हिमतसिंगका
मोतीलाल तापुरिया
रामेश्वरलाल नोपानी
नवीनचंद्र मफतलाल

: जनरल मॅनेजर :

बी. टी. ठाकूर

भारत, बर्मा, पाकिस्तान आणि मलाया येथील महत्त्वाच्या शहरीं व गांवीं बँकेच्या शाखा असल्यानें आणि बँकेच्या सर्वंध जगभर एजन्सीच्या व्यवस्था असल्यानें भारतांत व भारताबाहेर अत्युत्कृष्ट बँकिंगची सेवा करण्यास बँक सुसज्ज आहे.


हें पत्र पुणें, पेठ शिवाजीनगर घ. न. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास', ८२१ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.